नि.दि.दा.क्र.१४८/२०१६
नि.क्र.८१

**प्रतिवादी करीता सा.क्र.२**

**वादीकरिता उलट तपास विधीज्ञ श्री.यु.एस.जाधव यांच्या वतीने शपथेवर सुरू**

१२. वादी क्र.१ यांचे वडिल युवराज यांच्या वडिलांचे नाव बाबूराव असे आहे. वादी क्र.१ यांचे वडील युवराज यांच्या जन्मदात्या आईचे नाव तेजाबाई असे आहे. युवराज हा तेजाबाई यांच्याकडे वास्तव्यास होते म्हणून आम्ही त्यांना तेजाबाई यांचा मुलगा असे संबोधतो. युवराज हे कोणत्या कारणातून मयत झाले हे मला माहित नाही. वादी क्र.३ यांना मी पाहिलेले नाही. माझा सरतपास यामधील परिच्छेद क्र.१ मधील मजकूर की, वादी क्र.३ या बाबूराव यांच्या घरी थोडया दिवस राहिल्या, नंतर त्या माहेरी निघून गेल्या, त्या परत आल्या नाहीत याबाबत मला माहिती नाही. वादी क्र.१ यांचे वडिल युवराज यांना मी १ ली वर्गापासून १० वी वर्गापर्यंत पाहिलेले आहे. युवराज इयत्ता १० वी मध्ये कोणत्या वर्षी होते ते मला आठवत नाही. युवराज १० वी वर्गानंतर औरंगाबाद येथे गेल्याची मला वैयक्तिक माहिती आहे. ते तेथे किती दिवस राहिले हे मला माहित नाही. युवराज औरंगाबाद येथे गेल्यानंतर त्यांनी काही दिवस कंपनीत नोकरी केली व त्यानंतर स्वत:चा जेसीबी क्रेन घेतला. त्या जेसीबी क्रेनचा क्रमांक, त्याची कंपनी व ईतर तपशील मी सांगू शकत नाही.

१३. माझी जन्म तारिख १०/०४/१९७७ अशी आहे. वादी क्र.३ दैवताबाई व प्रतिवादी क्र.१ बाबूराव हे पती पत्नी म्हणून अनसरवाडा येथे राहत असताना त्यांना युवराज हा मुलगा जन्मला हे मला माहित नाही. प्रतिवादी क्र.१ व वादी क्र.३ यांच्यामध्ये भांडण झाल्यामुळे वादी क्र.३ या माहेरी निघून गेल्या हे मला माहित नाही. प्रतिवादी क्र.३ दिलीप हा प्रतिवादी क्र.२ तेजाबाई यांच्या बहिणीचा मुलगा आहे. दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.२ तेजाबाई या वहिवाटतात हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी क्र.२ तेजाबाई यांच्या सांगण्याप्रमाणे मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.06.23 17:34:41 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक २३/०६/२०२५.